**सुविचार**

संदेहाने सत्याचे दर्शन होते.- ह्यूम

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 114 ■ रविवार, दि. 30 नोव्हेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



धनुष आणि क्रिती सेनॉन स्टारर 'तेरे इश्क में'नं केली बॉक्स ऑफिसवर पहिल्या दिवशी धमाकेदार कमाई...

आतील पान


## सर्वोच्च न्यायालयात तातडीची प्रकरणे २ दिवसांत आपोआप सूचीबद्ध होणार, तोंडी उल्लेखाची गरज नाही

### सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी प्रक्रिया केली सुलभ

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:** सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीसाठीच्या प्रकरणांची यादी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी पावले उचलली आहेत. प्रकरणांची यादी आणि उल्लेख करण्यासाठी नवीन परिपत्रक जारी करुन नियमांमध्ये काही बदल केल्याचे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. हे नियम १ डिसेंबरपासून लागू होणार आहेत.

परिपत्रकानुसार, तातडीची नवीन प्रकरणे सुनावणीसाठी आपोआप सूचीबद्ध केली जातील. त्यामुळे वकिलांना त्यांच्या प्रकरणाचा तोंडी उल्लेख खंडपीठासमोर करण्याची गरज राहणार नाही. व्यक्ती स्वातंत्र्याशी संबंधित सर्व नवीन प्रकरणे आणि तातडीने अंतरिम आदेशाची विनंती केलेले प्रकरणे, दोन कामकाजाच्या दिवसांत सूचीबद्ध केले जातील, असे परिपत्रकात म्हटले आहे.

सर्व जामीन याचिकांचा जलदगतीने निकाली काढण्यासाठी,



संबंधित नोडल अधिकारी, सरकारी वकिल यांना आगाऊ प्रत सादर करावी लागेल, असे परिपत्रकात म्हटले आहे. अटकपूर्व जामीन, मृत्युदंड, बंदी, बेदखल करणे, ताब्यात घेणे यासारख्या अपवादात्मक तातडीच्या प्रकरणांचा सकाळी १०:०० ते सकाळी १०:३० दरम्यान तोंडी उल्लेख करता येईल. नवीन प्रकरणांच्या इतर सर्व श्रेणी विद्यमान पद्धतीनुसार आपोआप सूचीबद्ध केल्या जातील. कोणत्याही वरिष्ठ वकिलांना कोणत्याही न्यायालयात तोंडी उल्लेख करण्याची परवानगी दिली जाणार नाही. तरुण आणि कनिष्ठ वकिलांना तोंडी उल्लेख करण्यास परवानगी असेल. जुन्या नियमित सुनावणीच्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी, न्यायालयांसमोर सूचीबद्ध अशा प्रकरणांना स्थगिती देण्याची मागणी करणारे कोणतेही पत्र पाठविण्यास परवानगी दिली जाणार नाही, असे परिपत्रकात म्हटले आहे.

## दिल्लीसारखा बॉम्ब स्फोट अमरावतीत करणार; पोलीस कंट्रोल रुमला धमकी

**अमरावती/प्रतिनिधी :** दिल्लीत झालेल्या बॉम्ब स्फोटासारखा स्फोट आता अमरावतीत करणार आहोत, असा निनावी कॉल शुक्रवारी रात्री पोलीस कंट्रोल रुमला मिळाल्याने खळबळ उडाली. यानंतर पोलिसांनी तपासाची चक्र वेगाने फिरवली. यातील संबंधित व्यक्तीला पोलिसांनी अटक केली आहे. पोलीस अधिकचा तपास करत आहेत.

धमकी मिळाल्यामुळं पोलिसांनी श्री अंबादेवी आणि एकवीरा देवी मंदिर, रेल्वे स्थानक आणि अमरावती मध्यवर्ती बस स्थानकावर कडेकोट बंदोबस्त लावलाय.

पोलीस कंट्रोल रुमला शुक्रवारी रात्री कॉल करणारा व्यक्ती हा इंदौरला आल्याची माहिती मिळताच शुक्रवारी रात्रीच पोलिसांचे पथक इंदोरला रवाना झाले होते. शनिवारी सकाळी अमरावती पोलिसांनी त्या व्यक्तीला ताब्यात घेतले असून, रविवारी पहाटे त्याला अमरावतीला आणलं जाईल, अशी माहिती पोलिसांनी दिली.बॉम्ब स्फोटाची धमकी देणारा व्यक्ती हा अमरावती शहरातील नांदगपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहतो. त्याचे नाव तो पांडुरंग सांगतो आणि एक विशिष्ठ धर्म स्वीकारला, असंही तो बोलतो. साहिल या नावाने त्याचं फेसबुकवर अकाउंट आहे. तो अनेक दिवसांपासून पोलीस कंट्रोल रुमला कॉल करून पोलिसांना शिवीगाळ करतो. आता अमरावतीत बॉम्ब स्फोट करतो, असा कॉल त्याने पोलिसांना केलाय,'' अशी माहिती गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांनी दिली.बॉम्ब स्फोट घडवण्याची धमकी देणारा आरोपी यानं यापूर्वीही माजी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांना देखील पोलीस कंट्रोल रुमला कॉल करून धमकी दिली होती. हा आरोपी केवळ पोलीस कंट्रोल रुमलाच कॉल करतो आणि त्रास देण्याचा प्रयत्न करतो, असं देखील संदीप चव्हाण म्हणाले.

## नाशिकच्या तपोवनातील झाडांचा जादूटोणा करण्यासाठी वापर; अंनिसचा संशय

**नाशिक /प्रतिनिधी :** आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नाशिक तपोवनातील झाडं तोडण्याचा वाद चिघळला असून येथील काही वृक्षांवर जादुटोणा करुन चिठ्ठ्या लावल्या असल्याचे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांना आढळून आले. त्यांनी त्या चिठ्ठ्या काढून घेत उपस्थितांचं प्रबोधन केले.नाशिकमध्ये पर्यावरण प्रेमींचे तपोवनातील वृक्षतोडी विरोधात अंदोलन सुरू आहे. इतर संघटनांप्रमाणे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने त्यास पाठिंबा दिला आहे. अंदोलनासाठी शनिवारी अनेक संघटनांचे कार्यकर्ते तपोवनातील जंगलात आले होते. अंनिसचे राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे हेही तिथे हजर होते. चिपको अंदोलनाचा भाग म्हणून त्यांनी एका वृक्षाला मिठी मारली. त्यावेळी वृक्षाला चिठ्ठ्यांच्या सुरळ्या अडकवलेल्या दिसल्या. त्या दोरीने वृक्षास बांधलेल्या होत्या. त्याबद्दल संशय आल्याने त्यांनी एक सुरळी उघडून पाहिली. त्यात पंधरा-वीस चिठ्ठ्या आढळून आल्या.

## ...मग तिकडेच साधूग्राम करा, संधीसाधूपणा करू नका

### वृक्षतोडीवरून राज ठाकरे यांनी सरकारला सुनावले



**मुंबई /प्रतिनिधी :** साधूग्रामसाठी वृक्षतोड करावीच लागणार आहे, असे सरकारमधील मंत्री गिरीश महाजन सांगत असताना वृक्षतोड होऊ देणार नाही, असे ठामपणे सांगणाऱ्या पर्यावरण प्रेमी, सामाजिक संघटनांच्या आवाजात राजकीय पक्षांची देखील भर पडत आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी तपोवनातील वृक्षतोडीला जाहीर विरोध करून सरकारने संघर्षाची भूमिका घेतल्यास आम्हीही संघर्ष करण्यासाठी तयार असल्याचे सांगितले आहे. तसेच मनसेच्या महापालिकेतील सत्ता काळात कुंभमेळ्याचे झालेले यशस्वी नियोजन आणि त्याची दखल >> पान २

## आता डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय खोकल्याचे औषध मिळणार नाही

### मुलांच्या सुरक्षेसाठी सरकारचा मोठा निर्णय!



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:** खोकल्यावरील औषधाच्या अतिसेवनामुळे तसेच त्याच्यातील घातक घटकांमुळे लहान मुलांचे मृत्यू आणि गंभीर दुष्परिणाम झाल्याच्या घटना समोर आल्यानंतर केंद्र सरकारने याच्या अनिर्बंध विक्रीवर कडक निर्बंध लादण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यापुढे अनेक खोकल्याची औषधे डॉक्टरांच्या वैद्यकीय प्रिस्क्रिप्शनशिवाय मेडिकल दुकानांमध्ये दिली जाणार नाहीत.

या नियमांचे उल्लंघन होऊ नये म्हणून, औषध विक्रेत्यांना प्रत्येक प्रिस्क्रिप्शनचा रेकॉर्ड ठेवावा लागणार आहे. त्याचबरोबर, कफ सिरपच्या उत्पादन आणि गुणवत्ता तपासणीचे नियम अधिक कठोरपणे पाळणे अनिवार्य करण्यात आले आहे.

सरकारच्या सर्वोच्च नियामक संस्था असलेल्या औषध सल्लागार समितीने कफ सिरपला त्या शेड्यूलमधून वगळण्याची मंजुरी दिली आहे, ज्या तरतुदी कफ सिरपला परवाना आणि विशेष देखरेख नियमांमधून सूट देत होत्या. म्हणजेच, या निर्णयामुळे कफ सिरप खरेदी करण्यासाठी डॉक्टरांचा सल्ला आणि प्रिस्क्रिप्शन बंधनकारक असेल.

औषध सल्लागार समितीच्या एका सदस्याने दिलेल्या माहितीनुसार, गेल्या तीन वर्षांत भारतातून निर्यात केलेल्या अनेक कफ सिरपमध्ये घातक रसायने (उदा. डाय-एथिलीन ग्लायकोल >> पान २

## कुंभमेळ्याच्या नावाखाली नाशिकमध्ये झाडे तोडण्याचा घाट; काँग्रेसचा हल्लाबोल, मुंबई वायू प्रदूषणावरुही धरले धारेवर

**मुंबई /प्रतिनिधी :** मुंबईमध्ये गेले काही दिवस हवेची गुणवत्ता इतकी खराब झाली आहे की, श्वास घेणंदेखील कठीण झालेय. मुंबईतील अनेक भागात हवेची गुणवत्ता ही ढासळली आहे. त्यामुळे पालिकेनंही विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. शहरातील अनेक रस्ते पाण्याने धुतले जात आहेत. तसंच अनेक बांधकामे थांबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या सर्व बाबींवरुन काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी टीका केली.

काँग्रेसकडून सरकारचा निषेध : वाहन प्रदूषण, धूर आणि बांधकामातील धुळ या सगळ्यांमुळं नागरिकांचा श्वास कोंडला जात आहे. मुंबईत वायू प्रदूषणामुळं हवा धोकादायक पातळीवर पोहोचली आहे. मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये काँग्रेसचे पदाधिकारी मास्क आणि ऑक्सिजन सिलेंडर घेऊन पोहोचले होते. तसंच फलक दाखवत त्यांनी सरकारचा निषेध केला. खराब हवेमुळं मुंबईच्या नागरिकांचं आयुष्य सहा ते सात वर्षांनी कमी होत असल्याचा सर्वे समोर आल्याचे गायकवाड यांनी सांगितले.

## बिहारसारखे यश, नगरपालिकेला २०० पेक्षा जास्त जागांवर भाजपचे नगराध्यक्ष जिंकतील

### चंद्रकांत पाटलांना विश्वास

**दैनिक आपला विदर्भ**

**नाशिक/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात एकूण २८० जागी निवडुक सुरु आहे. त्यामध्ये २५६ ठिकाणावर भाजप कमळावर निवडणूक लढवत आहे. त्यापैकी भाजप २०० नगराध्यक्ष पदाच्या निवडणुका जिंकेल असा विश्वास मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला. प्रचाराला उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे, ही धरुन आणलेली गर्दी नाही. देवेंद्र फडणवीस, आम्ही फिरतोय, त्यामुळं या निवडणुकीत बिहार सारखं आणि महाराष्ट्र विधानसभा सारखं यश मिळेल असा आम्हाला विश्वास असल्याचे चंद्रकांत पाटील म्हणाले.

नाशिक झाडे तोड प्रकरणावर काय म्हणाले चंद्रकांत पाटील?

नाशिक झाडे तोड प्रकरणावरही चंद्रकांत पाटील यांनी प्रतिक्रिया दिली. नेमकं काय घडले माहित नाही, हा नेहमीचाच वाद आहे. विकास की पर्यावरण पण या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या आहेत असं चंद्रकांत पाटील म्हणाले. या मुद्द्यामुळेच मुंबईची मेट्रो लांबवली. समृद्धी महामार्गमध्ये देखील असेच झालं होतं. पर्यावरण वाद्यांनी देखील विचार केला पाहिजे. जेवढी झाडे आम्ही तोडू त्याच्या पाचपट झाडे आम्ही लावणार आहोत. जुनी झाड दुसऱ्या ठिकाणी लावण्याची



यंत्रणा कार्यान्वित झाली आहे. ती झाडे जगण्याचे प्रमाण ७० टक्के असल्याचे चंद्रकांत पाटील म्हणाले. नाशिक कुंभमेळ्यात एक करोडहून अधिक लोक येणार आहेत. जगातून देखील लोक येणार आहेत असे चंद्रकांत पाटील म्हणाले. सिंधुदुर्गमध्ये महायुतीत सुरु असलेल्या वादावर देखील चंद्रकांत पाटील यांनी प्रतिक्रिया दिली. >> पान २

## 'उद्धव ठाकरेंनी राज ठाकरेंना सोबत घेऊन चूक केली' - रामदास आठवले

**पुणे/प्रतिनिधी :** राज्यात जवळपास पाच वर्षानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत, त्यामुळे प्रत्येक राजकीय पक्षाच्या नेत्यांच्या सभा आणि रॅली आयोजित केल्या जात आहेत. या सभा आणि रॅलींच्या माध्यमातून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप पाहायला मिळत आहेत. याच दरम्यान, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (अ) गटाचे अध्यक्ष आणि केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले हे पुणे दौऱ्यावर होते. त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना अनेक राजकीय घडामोडींबद्दल भाष्य केले. यावेळी आठवले म्हणाले की, राज्यातील महापालिका निवडणुका महायुती म्हणून लढविल्या जाणार आहेत आणि त्यामध्ये रिपब्लिकन पक्षाला योग्य जागा मिळाव्यात. मुंबई महापालिकेत १७ ते १८ तर पुणे महापालिकेत २० जागा मिळाव्यात अशी त्यांची अपेक्षा आहे. तसेच, मुंबईत ठाकरे बंधूंचे काही एक चालणार नाही, कारण मुंबई महापालिका निवडणुकीत ठाकरे बंधूंना मोठा झटका देण्याची त्यांच्यावर मोठी जबाबदारी आहे.

## लग्नाला चाललेलं जोडपं हायवेवरून रहस्यमयरित्या गायब, फोन बंद, कारही गायब, घातपाताचा संशय





**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** तेलंगणा राज्यातून जळगाव जिल्ह्यातील एका लग्न सोहळ्यासाठी खासगी कारने निघालेले एक दाम्पत्य बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव ते मलकापूरदरम्यान महामार्गावर रहस्यमयरीत्या बेपत्ता झाल्याने खळबळ उडाली आहे. या बेपत्ता घटनेमुळे परिसरात घातपाताचा संशय व्यक्त केला जात आहे. पद्मसिंह दामू पाटील (राजपूत) हे त्यांची पत्नी नम्रता पाटील असं या दाम्पत्याचं नाव असून त्यांच्या कारचा क्रमांक ᳚पब १३ ᳚ब ८५८३ आहे. ते या कारने जळगाव जिल्ह्यातील पाचोरा येथील लग्नासाठी निघाले होते. पाटील हे तेलंगणा राज्यातील सीतापूरम येथील एका खासगी सिमेंट कंपनीत कार्यरत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, या दाम्पत्याने २७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६:३० वाजता आपल्या नातेवाइकांशी शेवटचा फोनवर संवाद साधला होता. नातेवाईक जळगावला पोहोचले, मात्र पाटील दाम्पत्य निर्धारित वेळेत पोहोचले नाही. वारंवार फोन करूनही दोघांचेही मोबाइल स्विच ऑफ येत असल्याने नातेवाइकांचा संशय वाढला. तपासात, दाम्पत्याच्या मोबाइलचे शेवटचे लोकेशन बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव ते मलकापूरदरम्यान महामार्गावर असलेल्या वडनेर भोलजी (ता. नांदुरा) गावाजवळ आढळून आले. तसेच, त्यांची कार २७ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ७:११ वाजता बाळापूरजवळील तरोडा टोल नाका ओलांडताना सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसली होती. मात्र, वडनेर भोलजीनंतर या दाम्पत्याचा कोणताही मागमूस लागला नाही. दाम्पत्याच्या अचानक बेपत्ता होण्यामुळे त्यांचे नातेवाईक संदीप रमेश पाटील यांनी नांदुरा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. विशेष म्हणजे, महामार्गावर कोठेही त्यांच्या गाडीचा अपघात नोंदवलेला



नसल्याने या घटनेमागे घातपाताचा तीव्र संशय व्यक्त केला जात आहे.

नांदुरा पोलीस ठाण्याचे पीआय जयवंत सातव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तपासाला गती दिली आहे.

## मराठी भाषेला समृध्द करणारे साहित्यिक : डॉ नागनाथ कोत्तापल्ले

मराठीतील दिवंगत जेष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांचा आज स्मृतिदिन. तीन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ३० नोव्हेंबर २०२२ रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले होते. मराठी साहित्य विश्वातील एक प्रतिथयश साहित्यिक म्हणून ओळखले जाणाऱ्या डॉ नागनाथ कोतापल्ले सरांचा जन्म २९ मार्च १९४८ रोजी नांदेड जिल्ह्यातील मुखेड या गावी झाला. डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांचे शिक्षण गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. १९६९ साली डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी देगलुर येथून बी ए ची पदवी मिळवली. बी ए ची पदवी मिळवताना ते मराठवाड्यात तिसरे तर मराठी विषयात पहिले आले होते. त्यानंतर मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी एम ए पूर्ण केले आणि १९८१ साली यु. म. पठाण सरांच्या मार्गदर्शनाखाली शंकरराव पाटील यांच्या साहित्याच्या चिकित्सक अभ्यास या विषयावर पी एच डी मिळवली. १९७१ ते १९७७ या काळात त्यांनी बीड येथील महाविद्यालयात अध्यापन केले. अध्यापक म्हणून म्हणून पवित्र कार्य करताना त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. नागनाथ कोत्तापल्ले १९७७ मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात प्राध्यापक होते त्यानंतर ते पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख बनले. २००५ ते २०१० पर्यंत कोत्तापल्ले सर डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होते. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी १९७० पासून लेखनास सुरुवात केली. मुड्स हा त्यांचा कविता संग्रह १९७६ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर कर्फ्यु आणि इतर कथा व संदर्भ हे दोन कथा संग्रह प्रकाशित झाले. कवीच्या गोष्टी आणि सावित्रीच्या लेकी या त्यांनी लिहिलेल्या दीर्घ कथा त्या काळी त्या काळात खूप गाजल्या. या दरम्यान त्यांच्या गांधरीचे डोळे आणि मध्यरात्र या कादंबऱ्या आणि इतर बरेच ललित साहित्य प्रकाशित झाले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी कथा, कादंबरी, ललित लेख सोबतच समीक्षा लेखनही केले. साहित्याचा अन्वयार्थ, आधुनिक मराठी कविता, नव कथाकार शंकर पाटील, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि बोध हे त्यांचे समीक्षात्मक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. निवडक बी. रघुनाथ आणि स्त्री पुरुष तुलना या ग्रंथाचे संपादनही त्यांनी केले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी अनेक महत्वाच्या पदावर अध्यक्ष म्हणून काम केले. नॅक, राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी, राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, बाल पुरस्कार समिती आणि एच. एस. सी बोर्डाचे मराठी अभ्यास मंडळ अशा महत्वाच्या संस्थांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. याशिवाय मराठी साहित्य परिषदेचे कार्यवाहकपदही त्यांनी सांभाळले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर काही नियतकालिकांचे संपादकही होते. २०१२ साली चिपळूण येथे झालेल्या ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. जवळपास पाच दशके आपल्या समर्थ लेखणीने मराठी भाषेला समृद्ध करून डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर आपल्यातून निघून गेले. त्यांच्या निधनाने मराठी विषयाची अपरिमित हानी झाली. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# लोणारच्या राजकीय वातावरणात ऊर्जेचा नवचैतन्याचा संचार

➤ शिवसेनेच्या जाहीर सभेला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

➤ लोणारमध्ये विकासाचे परिवर्तन घडवूया... धनुष्यबाण विजयी करण्याचा दृढ संकल्प





**दैनिक आपला विदर्भ**

**लोणार/प्रतिनिधी :** लोणार नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीत शिवसेना उमेदवारांच्या प्रचारार्थ काटे नगर येथे आयोजित जाहीर सभेला मतदारांकडून अभूतपूर्व आणि उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सभेत उपस्थित प्रत्येक नागरिक आणि कार्यकर्त्यांनी ''लोणारमध्ये परिवर्तन, विकास आणि पारदर्शक कारभार'' घडवण्याचा निर्धार व्यक्त करत धनुष्यबाणाला विजयी करण्याचा संकल्प केला.

या भव्य सभेला केंद्रीय मंत्री नामदार प्रतापराव जाधव, तसेच माजी आमदार संजय रायमुलकर, आणि शिवसेना पक्षाच्या अधिकृत प्रवक्ता प्रा.डॉ. ज्योतीताई वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवसेना पक्षाच्या नगराध्यक्षा पदाच्या अधिकृत उमेदवार सौ. संगीता गोविंद मापारी, तसेच विविध प्रभागातील नगरसेवक पदाचे उमेदवार उपस्थित होते.

सभास्थळी उठलेल्या घोषणाबाजी, उपस्थितांची प्रचंड गर्दी आणि विजयी वातावरण पाहता शिवसेना उमेदवारांच्या विजयाची चाहूल स्पष्टपणे जाणवत होती. शहरातील बंधू-भगिनी, ज्येष्ठ नागरिक, युवकयुवती आणि हजारो कार्यकर्त्यांनी सभेला उत्स्फूर्त उपस्थिती लावून शिवसेनेवरील आपला अढळ विश्वास दृढ केला.

मार्गदर्शन करताना केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव म्हणाले : ''लोणारच्या सर्वांगीण विकासासाठी जनतेचा विश्वास आणि सक्षम नेतृत्वाची साथ हीच शिवसेनेची खरी ताकद आहे. नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी कायम प्रत्यक्ष संपर्कात राहणारा पक्ष म्हणजे शिवसेना. म्हणूनच येत्या निवडणुकीत धनुष्यबाण समोरील बटन दाबून शिवसेनेच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा.''

सभेचे आयोजन उत्कट उत्साहात संपन्न झाले असून लोणार शहरात विकासाची नवी पहाट उगवणार असल्याचा आशावाद नागरिकांनी व्यक्त केला.

शिवसेना, युवासेना, महिला आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित.

# सॉफ्टवेअर अपग्रेडसाठी विमानसेवा स्थगित करण्याचा निर्णय!

### प्रवाशांनी विमानतळावर जाण्यापूर्वी परिस्थिती तपासावी, इंडीगोची सूचना

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** जगातील सर्वाधिक विक्री होणारी एअरबस ए३२० विमाने सॉफ्टवेअर अपग्रेडसाठी स्थगित करण्यात येणार आहेत. यामुळे भारतासह जगभरातील विमानप्रवासाला फटका बसणार आहे. एअरबसने तीव्र सौर किरणोत्सर्गामुळे ए३२० फॅमिली विमानांमधील फ्लाइट कंट्रोल सिस्टमद्वारे वापरला जाणारा डेटा करप्ट होण्याची भीती व्यक्त केल्यानंतर, इंडिगो, एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्सप्रेस या विमान कंपन्यांनी सॉफ्टवेअर अपग्रेडसाठी विमानसेवा स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भारतातील २०० ते २५० विमानांना ताल्लेगळ सॉफ्टवेअर अपग्रेड किंवा हार्डवेअर री-अलाइनमेंटची आवश्यकता असल्यामुळे दुरुस्ती कामासाठी विमान कंपन्यांना विमानसेवा थांबवावी लागणार आहे. भारतात, इंडिगो आणि एअर इंडिया ग्रुपच्या ३५० हून अधिक ए३२० विमानांची उड्डाणे या अपग्रेडसाठी थांबवली जाणार आहेत. अपग्रेडसाठी दोन ते तीन दिवस लागणार असल्याने विमान सेवा सुरळीत होण्यासाठी पुढील आठवडा उजाडणार असल्याचा अंदाज आहे.




अमेरिकन विमान कंपनी जेटब्लूचे कॅनकुन ते न्यूआर्क हे ए३२० विमान ३० ऑक्टोबर २०२५ रोजी पायलटच्या सूचनांशिवाय अनपेक्षितपणे खाली उतरले होते. या घटनेच्या पार्श्वभूमीवर एअरबस विमानांचे सॉफ्टवेअर अपग्रेड करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नॅशनल ट्रान्सपोर्टेशन सेफ्टी बोर्डाच्या म्हणण्यानुसार, हे विमान अनियंत्रितपणे खाली उतरल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. ज्यामुळे काही प्रवाशांना रुग्णालयात दाखल करावे लागले होते.

इंडिगोने दिलेल्या माहितीमध्ये सांगण्यात आले आहे की, ''एअरबसने जागतिक ए३२० ताफ्यासाठी तांत्रिक सल्लागार जारी केला आहे. आम्ही आमच्या विमानांवरील अनिवार्य अपग्रेड पूर्ण काळजीने आणि सर्व सुरक्षा प्रोटोकॉलनुसार पूर्ण करत आहोत. आम्ही या सावधगिरीच्या अपग्रेडवर काम करत असताना, काही उड्डाणांच्या वेळापत्रकात काही किरकोळ बदल होऊ शकतात. आमचे पथक तुम्हाला पुन्हा तिकीट बुकिंग, अपडेट्स आणि माहितीसह मदत करण्यासाठी सदैव तयार आहे. विमानतळावर जाण्यापूर्वी कृपया आमच्या ॲप/वेबसाइटवर तुमची विमान स्थिती तपासा.''

# पोलीस देणार वन अधिकाऱ्यांना शस्त्र हाताळणीचे प्रशिक्षण

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** वनविभागातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आता पोलिसांकडून शस्त्र हाताळणीचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्याचबरोबर मानव-बिबट्या संघर्ष जनजागृती करण्यासाठी 'वन पाटील' ही मानद संकल्पना जिल्ह्यात राबवली जाणार आहे. आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी पोलीस व वनविभागाच्या वतीने संयुक्त सराव प्रात्यक्षिके (मॉकड्रील) आयोजित करण्याचा निर्णय पोलीस व वन विभागाच्या संयुक्त बैठकीत घेण्यात आला.

अहिल्यानगर जिल्ह्यात वाढलेल्या मानव-बिबट्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. जिल्हा व्याघ्र कक्ष समितीच्या या बैठकीस उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, विभागीय वनाधिकारी दक्षता डॉ. अजित साजणे, सहायक वनसंरक्षक अनिल पवार, गणेश मिसाळ, अश्विनी दिघे, वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलोरे, दादासाहेब वाघुलकर, मानद वन्यजीव रक्षक मंदार साबळे, डॉ. सुधाकर कुऱ्हाडे, पोलीस स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी आदी उपस्थित होते.

'एआय'चा (कृत्रिम बुद्धिमत्ता) वापर करत बिबट्या आल्याच्या बनावट चित्रफिती तयार करून त्या प्रसारित केल्या जात आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा बनावट चित्रफिती तयार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशाराही जिल्हा पोलीस अधीक्षक घार्गे यांनी दिला आहे.

मानव-बिबट्या संघर्षाबाबत जनजागृती करण्यासाठी, आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी वनविभागातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांना पोलिसांकडून शस्त्र हाताळणीचे प्रशिक्षण, विविध गावातील पोलिसांच्या समाज माध्यमांच्या गटांमध्ये वन अधिकाऱ्यांचा समावेश केला जाणार आहे. वन्यप्राणी अपघात टाळण्यासाठी अपघातप्रवण (ब्लॅक स्पॉट) ओळखणे तसेच अस्तित्वातील व नव्या विहिरींना सुरक्षित कठडे बांधण्याबाबत शेतकरी व संबंधित विभागांना आवाहन करण्यात येणार आहे.

पान १ वरून...

## ...मग तिकडेच साधूग्राम

घेऊन अमेरिकेत झालेला सत्कार याचा दाखला सरकारला दिला आहे.

आगामी कुंभमेळ्यासाठी सरकारने १८०० झाडं तोडण्याचा निर्णय घेतला आहे. नाशिकमध्ये कुंभमेळा हा काही पहिल्यांदा होत नाहीये. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महापालिकेच्या सत्ताकाळात पण कुंभमेळा झाला. त्यावेळेला आम्ही भरपूर पायाभूत सुविधा उभारल्या. त्यावेळच्या नगरसेवकांचा आणि प्रशासनाचा उत्तम संवाद होता, त्यामुळे कामं करताना जनतेला काय हवं आहे याचा विचार केला गेला. एकूणच नियोजन इतकं उत्कृष्ट होतं की तेव्हाच्या महापौरांचा, नगरसेवकांचे प्रतिनिधी म्हणून आणि तत्कालीन आयुक्तांचा, प्रशासनाचे प्रतिनिधी म्हणून, थेट अमेरिकेत सत्कार झाला होता. आम्हाला या पायाभूत सुविधा उभ्या करताना कुठली झाडं तोडावी लागली नाहीत. मग आत्ता या कुंभमेळ्यासाठी झाडं का तोडावी लागत आहेत? असा सवाल राज ठाकरे यांनी विचारला.

बरं ही झाडं तोडून त्याची भरपाई म्हणून दुसरीकडे झाडं लावली जातील, असली पोकळ आश्वासनं सरकारने देऊच नयेत कारण असं कधी होत नाही. आणि सरकारकडे जर दुसरीकडे पाचपट झाडं लावायला जागा आहे तर मग तिकडेच साधूग्राम करा. सरकारने साधूंच्या नावाखाली उद्योगपतींच्या घशात काहीतरी टाकण्याचा संधीसाधूपणा करू नये. आणि काही कोटी झाडं लावल्याची घोषणा भाजप सरकारने काही वर्षांपूर्वी केली होती, जी झाडं कुठे दिसली नाहीत, असा वार राज ठाकरे यांनी केला.

आज कुंभमेळ्याचं कारण दाखवून झाडं तोडायची, साधूंच्या नावाने ती जमीन सपाट करून घ्यायची आणि मग नंतर पुढे ती आपल्या लाडक्या उद्योगपतीला दान करायची! इतकाच विचार या सरकारचा असणार! नाहीतरी सध्या महाराष्ट्रात दुसरं काय सुरू आहे ? जमिनी गिळणं नाहीतर उद्योगपतींचे दलाल म्हणून काम करणं हेच सध्या सत्ताधारी मंत्री, आमदार , त्यांचे नातेवाईक आणि त्यांची वतुर्ळ करताना दिसतायत, अशा शब्दात त्यांनी सत्ताधाऱ्यांना लक्ष्य केले. नाशिककरांचा या वृक्षतोडीला तीव्र विरोध आहे. नाशिकरांना माझं आवाहन आहे की तुम्ही ठाम रहा, तुमच्या पाठीशी महाराष्ट्र नवनिर्माण सेना उभी राहील. यामध्ये खरंतर कोणतेच राजकारण नाही , या आत्ता होणाऱ्या निवडणुकांनंतर देखील आमचा या वृक्षतोडीला विरोधच राहील! माझं सरकारला आवाहन आहे की उगाच संघर्ष वाढवू नका. लोकांचं काय म्हणणं आहे त्याचा कधीतरी आदर राखला जाईल असं पहा. तरीपण सरकारने संघर्षाची भूमिका घेतली तर जनतेच्या बरोबर या लढ्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेना आहेच आणि असेलच !

## बिहारसारखे यश, नगरपालिकेला

ज्यावेळेला स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका कशा लढवाव्यात याबाबत चर्चा झाली. त्यावेळेला देवेंद्र फडणवीस यांनी कोणतीही संदिग्धता न राहता स्थानिक कार्यकर्त्यासाठी निवडणूक लढवावी लागली तर एकमेकावर टीका करु नये असं सांगितलं होतं. पण हे पथ्य काही ठिकाणी पाळलेलं नाही. काही ठिकाणी घडलेल्या घटनांवरुन नियम तयार होत नाही. सिंधुदुर्गात शिवसेनेच्या नेत्यांनी काहीतरी भूमिका मांडली तर त्यांचे नेते त्यांना समज देतील. एखाद्या नेत्याच्या घरी पैसे सापडले तर इन्कम टॅक्स डिपार्टमेंट आणि निवडणूक आयोग बघेल असे चंद्रकांत पाटील म्हणाले. पण तुम्हाला कोणी त्या घरात घुसण्याचा अधिकार दिला. निलेश राणे वागले म्हणजे शिवसेना वागले असं नाही. एकनाथ शिंदे यांनी त्यांना समज दिली असेल असेही चंद्रकांत पाटील म्हणाले. एखादा नेता चुकीचा वागला तर मुख्यमंत्री त्यांना तातडीने समज देतात. सिंधुदुर्गात हे घडलं म्हणून इतरत्र अशी परिस्थिती असं म्हणणं चूक आहे. काही ठिकाणी घडले असेल, पण अनेक ठिकाणी असं झालेलं नाही. उदाहरणार्थ कागल. पक्षश्रेष्ठींनी सांगितलं कागलमध्ये चिन्हावर निवडणूक लढवू नका. आम्ही ते मान्य केल्याचे चंद्रकांत पाटील म्हणाले. महाराष्ट्रात एकमेव कागल नगरपरिषद आहे जिथे भाजपाचा एकही माणूस नाही. गडहिंग्लज मध्ये देखील मुश्रीफ आणि आम्ही एकमेकांच्या विरोधात लढतोय, तिथं आम्ही शिव्या श्राप देत नाही असे चंद्रकांत पाटील म्हणाले.

आता जर २० जिल्हा परिषदेमध्ये ५० टक्के ओबीसी आरक्षण ओव्हर झाला आहे. तिथं रिजर्वेशन पडणार आहे. त्यामुळे निवडणुका लांबणार. तिथं काय भविष्य बघायला लागतं का? दोन नंतर निवडणुका लावणार असतील तर खूप काळ आहे बसून चर्चा करायला. पुढच्या निवडणुकीसाठी आचारसंहिता करू असं रवींद्र चव्हाण याचा बोलण्याचा हेतू असल्याचं चंद्रकांत पाटील म्हणाले. निवडणूक आयोग आहे, पोलीस यंत्रणा आहे. त्यामुळे उद्धवजींनी काळजी करण्याची गरज नाही. विधानसभा निवडणुकीत काही न देता माझे मार्जिन एक लाख १२ हजार राहिले आहे. त्यामुळे अशाप्रकारे म्हणून चूक आहे.

## आता डॉक्टरांच्या

आणि एथिलीन ग्लायकोल आढळली होती. या घटकांमुळे गांबिया, उझबेकिस्तान आणि कॅमेरूनसह भारतात मध्य प्रदेशातही काही लहान मुलांचे मृत्यू झाले होते. या घटनांच्या पार्श्र्वभूमीवर, खोकला-सर्दीसारख्या सामान्य आजारांवरही नागरिक डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध घेण्याऐवजी तज्ज्ञांचा सल्ला घेतील, यासाठी सरकार प्रयत्नशील आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# लोणार शहराचा एका वर्षात सर्वांगीण विकास करण्याचा शब्द देतो

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची लोणारवाशीयांना आश्वासन : शिवसेनेच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**लोणार/प्रतिनिधी** :जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ असलेल्या लोणार शहराचा विकास होण्याऐवजी शहर भकास झाले आहे. याला सर्वस्वी काँग्रेसची सत्ता जबाबदार आहे.मी तुम्हाला शब्द देतो की, शिवसेनेच्या हातात सत्ता द्या, एका वर्षात लोणार शहराचा सर्वांगीण विकास करून लोणार शहराला वैभव प्राप्त करून करून देतो. येत्या २ डिसेंबर रोजी लोणार नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. संगीताताई गोविंद मापारी यांच्यासह शिवसेनेच्या सर्व उमेदवारांना भरघोस मते देऊन विजयी करा, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोणार शहराच्या नगरपरिषद निवडणुकीत प्रचारादरम्यान केले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, लोणार शहराचा विकास करण्यासाठी मी मुख्यमंत्री असताना लोणार शहराचा विकास आराखडा मंजूर केला.

६३ कोटी रुपये पाणीपुरवठा योजनेसाठी मंजूर केले होते. लोणारमध्ये सांडपाणी प्रक्रिया, भुयारी गटार योजना मंजूर केली. मात्र मागील दहा वर्षापासून काँग्रेसची सत्ता असल्याने जागतिक दर्जा प्राप्त असलेल्या लोणार शहराचा विकास





खुंटला. लोणार शहराचा विकास होण्याऐवजी काँग्रेसने लोणार शहर भकास केले आहे.

आता मी तुम्हाला शब्द देतो की, लोणार नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. संगीताताई गोविंद मापारी यांना व सर्व शिवसेना उमेदवारांना निवडून आणा, लोणार नगरपरिषदेवर शिवसेनेची सत्ता येताच एका वर्षात पाणीपुरवठा योजना, भुयारी गटार योजना मार्गी लावल्याचे तसेच नगर विकास विभागाच्या माध्यमातून रस्त्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करून देतो. लोणार शहराच्या विकासासाठी कोणत्याही प्रकारचा निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देत लोणार शहराचा सर्वांगीण विकास करण्याचा मी तुम्हाला शब्द देतो, अशा आश्वासन दिले.

यासाठी येत्या २ डिसेंबर रोजी लोणार शहरवासीयांनी शिवसेनेच्या उमेदवारांना मतदान करून त्यांना विजयी करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोणार नगर परिषदेच्या नगर अध्यक्षपदाचे उमेदवार सौ. संगीताताई गोविंद मापारी व सर्व उमेदवाराच्या प्रचारादरम्यान केले.

## शिक्षिकेची विद्यार्थ्यांना बेदम मारहाण ; व्हिडीओ व्हायरल

जौनपूर : शिक्षक आणि विद्यार्थ्यांचं नातं हे किती पवित्र आणि अनोखं असतं, हे सर्वानाच ठाऊक आहे. शाळेच्या वर्गात शिक्षणाचे धडे गिरवून विद्यार्थी आपल्या ज्ञानात भर टाकतात. शिक्षकांनी जे काही शिकवतात, त्यानुसार विद्यार्थी त्यांच्या आयुष्यात बदल घडवतात. पालक त्यांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळवून देण्यासाठी काबाडकष्ट करतात आणि चांगल्या शाळेत त्यांचं ॅडमिशन करतात. पण काही शाळांमध्ये शिक्षकी पेशाला काळिमा फासणाऱ्या घटना घडतात. काही शिक्षक निरागस विद्यार्थ्यांना अमानुष मारहाण करतात, अशाप्रकारच्या अनेक घटना सोशल मीडियाच्या माध्यमातून व्हायरल झाल्या आहेत. असाच एका शिक्षिकेचा धक्कादायक व्हिडीओ समोर आला आहे.जौनपूर बदलापूर पोलीस पोलीस स्टेशनच्या हद्दीत भलुआही येथे एक शाळा आहे. या शाळेत लहान मुलं-मुली वर्गात बसलेले असतात. त्याचदरम्यान एक शिक्षिका या निरागस विद्यार्थ्यांच्या कानशिलात लगावते आणि नंतर त्यांना छडीनेही मारते. शिक्षिकेनं विद्यार्थ्यांना चुकीच्या पद्धतीने मारहाण केल्याचं कॅमेरात कैद झाल असून व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. हा व्हिडीओ पाहून नेटकऱ्यांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

# बांधकामस्थळांच्या पाहणीसाठी पाचसदस्यीय स्वतंत्र समिती

## मुंबईतील हवेचा दर्जा सुधारण्यासाठी उच्च न्यायालयाचा तातडीचा तोडगा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबइ/प्रतिनिधी :** बांधकामांशी संबंधित वायू प्रदूषण कमी करण्याच्या मार्गदर्शक तत्त्वांची योग्य अंमलबजावणी केल्यास ते आटोक्यात आणणे शक्य आहे, अशी टिप्पणी मुंबईतील हवेचा दर्जा खालावल्याप्रकरणी उच्च न्यायालयाने शुक्रवारी केली. तसेच, हवेचा दर्जा सुधारण्च्या दृष्टीने तातडीचा उपाय म्हणून प्रदूषणाचा प्रमुख स्रोत असलेल्या बांधकामस्थळी प्रदूषण नियंत्रण नियमांचे पालन केले जात आहे की नाही हे तपासण्यासाठी पाच सदस्यांची स्वतंत्र समिती स्थापन केली.

अतिवाईट हवा गुणवत्ता निर्देशांक असलेल्या परिसरांच्या पाहणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या समितीत महापालिका, एमपीसीबी, सार्वजनिक आरोग्य विभागाचे अधिकारी आणि दोन वकिलांचा समावेश असेल, असे मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने उपरोक्त आदेश देताना स्पष्ट केले. तसेच, पाहणीच्या वेळी समिती सदस्यांना सुरक्षा देण्याचे आणि त्यांना बांधकामस्थळी अल्पकालीन तपासणीसाठी प्रवेश देण्याचे आदेश देखील दिले. मुंबईतील वायू प्रदूषणाच्या सध्याच्या स्थितीसाठी बांधकामस्थळी निर्माण होणारी धूळ सर्वाधिक कारणीभूत असल्याचे आणि गेल्या वर्षभरापासून ही स्थिती रोखण्यासाठी महापालिकेने ठोस उपाययोजना केल्या नसल्याचे वरिष्ठ वकील दरायस खंबाटा यांनी न्यायालयाला सांगितले. त्यानंतर, न्यायालयाने उपरोक्त टिप्पणी करून हवेचा दर्जा सुधारण्यासाठीचा तातडीचा उपाय म्हणून सर्वाधिक प्रदूषण असलेल्या बांधकामस्थळांच्या पाहणीसाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्याचे आदेश दिले.

त्याचवेळी, गेल्या वर्षभरात हवा प्रदूषण रोखण्यासाठी काय कारवाई केली ? अशी विचारणा करून त्याचा तपशील सादर करण्याचे आदेश न्यायालयाने महापालिका आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला (एमपीसीबी) दिले. मागील आदेशाचा भाग म्हणून महापालिका आणि एमपीसीबीच्या पथकांनी बांधकाम स्थळांना भेटी दिल्या असतील आणि तेथे सीसीटीव्ही कॅमेरे, सेन्सर-आधारित वायू-प्रदूषण मॉनिटर्स बसवण्यात आली की नाही याची शहानिशा केली असेल. त्यामुळे, गेल्या वर्षभरातील या कारवाईचा तपशील सादर करावा, असे आदेश न्यायालयाने दिले. गोंधळ निर्माण करणारे विविध आदेश देण्याऐवजी, वायू प्रदूषण कमी कसे करता येईल आणि मुंबईतील हवेचा दर्जा कसा सुधारता येईल हे सुचवण्यासाठी तातडीच्या उपाययोजना करणे गरजेचे आहे. दिल्ली गेल्या १५ ते २० वर्षांपासून या समस्येचा सामना करत आहे. मुंबईच्या काही जमेच्या बाजू आहेत. त्यामुळे, मुंबईत ही स्थिती निर्माण होऊ नये यासाठी दीर्घकालीन योजना राबवता येऊ शकेल, असे न्यायालयाने म्हटले. बांधकामस्थळी प्रदूषण नियंत्रण नियमांचे पालन होते की नाही याची तपासणी करण्यासाठी ६४ विशेष पथके तैनात केली आहेत आणि ५३ बांधकांमांना काम थांबवण्याच्या नोटिसा दिल्या आहेत, शिवाय, लवकरच पथकांची संख्या ९० पर्यंत वाढवली जाईल, असा दावा महापालिकेतर्फे वरिष्ठ वकील मिलिंद साठे यांनी केला. तथापि, मुंबईतील एक हजार बांधकामस्थळांपैकी फक्त ४०० ठिकाणी सेन्सर बसवण्यात आले असून त्यातील केवळ १७० सेन्सर सुरू असल्याची बाब खंबाटा यांनी एका वृत्ताचा दाखला देऊन न्यायालयाच्या निदर्शास आणून दिली आणि हे वास्तव असल्याचे न्यायालयाला सांगितले. तर, महापालिकेचा दावा कागदावरच असल्याचा प्रतिवाद वनशक्तीच्या वतीने वरिष्ठ वकील जनक द्वारकादास यांनी केला. तसेच, बांधकामांना आयओडी प्रमाणपत्र देण्याच्या टप्प्यावर विकासकांना प्रदूषण नियंत्रण मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याची अट घालण्याची सूचना केली.

वाहनांचे उत्सर्जन हा देखील प्रदूषणाचा आणखी एक प्रमुख स्रोत असल्याचे खंबाटा यांनी न्यायालयाला सांगितले. तथापि, वाहन प्रदूषण सहजपणे हाताळता येते आणि रस्त्यावर काय होते हे सर्वांना माहिती आहे. आम्हाला असा कोणताही आदेश द्यायचा नाही, जेणेकरून अधिकाऱ्यांना परवाना मिळेल आणि ते वाहने जप्त करण्यास, चलन काढण्यास सुरूवात करतील. आमच्या आदेशांमुळे नागरिकांना त्रास नको, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. दर्पण गुप्ता यांनी वकील गुलनार मिस्त्री आणि पूजा थोरात यांच्यांमार्फत दाखल केलेल्या हस्तक्षेप अर्जात जनजागृती कार्यक्रमाचा भाग म्हणून शरद ऋतूपूर्वी आरोग्याची काळजी घेणाऱ्या सूचना प्रसिद्ध करण्याची मागणी करण्यात आली. त्यात प्रदूषणाच्या वेळी कोणती मुखपट्टी परिधान करावी आणि अन्य उपायांबद्दल शिक्षण देण्याची विनंती केली गेली.

## प्रेमाला विरोध असल्याने भाऊ आणि वडिलांनी केली प्रियकराची हत्या, प्रेयसीने मृतदेहाशी केले लग्न

**नांदेड/प्रतिनिधी** : घरातील कर्त्या तरुणाची हत्या झाल्याने कुटुंबीयांनी फोडलेला हंबरडा. . . परिसरात उसळलेला जनआक्रोश... रडण्याच्या किंकाळ्यांनी हादरलेले आसमान... अशात पुढं आलेलं हळदी कुंकू... मृतदेहाला लावण्यात आलेली हळद... प्रेयसीनं प्रियकराच्या मृतदेहासमोर लावलेलं त्याच्या नावाचं कुंकू... अन् मग मृतदेहाबरोबर लागलेलं प्रेयसीचं लग्न... या घटनेनं नांदेडकरांचं मन हेलावून गेलं. अगदी एखाद्या चित्रपटात शोभेल अशी मन सुन्न करणारी घटना नांदेडमधील गंज परिसरात पाहायला मिळाली.

मृतदेहासमोरच प्रियकराच्या नावाचं लावलं कपाळावर कुंकू : त्याचं झालं असं की, प्रेमात आकंठ बुडालेल्या दोन तरुण-तरुणींच्या प्रेमसंबंधास मुलीच्या घरच्यांचा तीव्र विरोध होता. या विरोधातूनच प्रियकराची गंज परिसरात हत्या करण्यात आली.


## फडणवीस, शिंदे, अजितदादा एकाच शहरात परस्परांच्या विरोधात प्रचारात सहभागी

**जालना /प्रतिनिधी :** जिल्हयातील परतूर नगरपरिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी सत्ताधारी 'महायुती' मधील भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेना या तीन घटकपक्षांचे उमेदवार स्वत:च्या चिन्हांवर परस्परांच्या विरुद्ध उभे आहेत. आपल्या उमेदवारांच्या प्रचारासाठी परतूरमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार आणि खासदार श्रीकांत शिंदे या तीन नेत्यांच्या परस्परांच्या विरोधात जाहीर सभा झाल्या. या तिन्ही नेत्यांनी प्रचार सभांमध्ये एकमेकांच्या पक्षांवर टीका केली नाही परंतु आपल्याला पक्षाच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवारास निवडून दिल्यास विकास कामांसाठी निधी कमी पडणार नसल्याची आश्वासने मात्र दिली. राष्ट्रवादीच्या उमेदवार शांताबाई हिवाळे यांच्या प्रचार सभेत अजित पवार अर्थमंत्री या नात्याने म्हणाले, मी वाढप्या म्हणून आलो असून आता किती घ्यायचे ते तुमच्या हातात आहे. पंक्तीत बसल्यावर जर वाढप्या ओळखीचा असेल तर जरा पोटभर जेवायला मिळते. विकास कामे करायची तर आर्थिक पाठबळ कोण देईल याचा विचार केला पाहिजे आणि त्याचे उत्तर आहे अर्थखाते! परतूरमधील मतदारांनी राष्ट्रवादीला साथ दिली पाहिजे

# सार्वभौमत्व, सुरक्षेबाबत तडजोड नाही : राजनाथ सिंह

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:** भारत शांतता, संवाद आणि जागतिक स्थैर्यावर विश्वास ठेवतो; पण देशाच्या सार्वभौमत्वाच्या आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबतीत कोणतीही तडजोड मान्य करणार नाही, असा ठाम संदेश संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी दिला. चाणक्य संरक्षण संवाद या कार्यक्रमात ते बोलत होते. त्यांनी पाकिस्तान आणि चीनची थेट नावे न घेतल्यानेही त्यांच्याकडेच हा इशारा असल्याचे स्पष्ट दिसून आले.

संरक्षणमंत्री सिंह म्हणाले की, बदलत्या जागतिक वातावरणात भारत आता संतुलनाचा व जबाबदारीचा आवाज म्हणून उदयास येत आहे. इंडो-पॅसिफिक प्रदेशातील देश तसेच



जागतिक दक्षिणमधील राष्ट्रे भारताला सर्वाधिक विश्वासार्ह भागीदार समजतात. आर्थिक प्रगती, विज्ञान-तंत्रज्ञानातील क्षमता आणि तत्त्वनिष्ठ परराष्ट्र धोरण यामुळे भारताचे स्थान जागतिक पातळीवर अधिक मजबूत झाले असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दहशतवाद, सीमापार अतिरेकी कारवाया, समुद्री मार्गांवरील दबाव, माहिती युद्ध आणि भू-राजकीय तणाव यांसारखी अनेक आव्हाने भारतासमोर असल्याचे ते म्हणाले. या अनिश्चिततेला सामोरे जाण्यासाठी सतत सज्ज राहणे आवश्यक आहे आणि म्हणूनच लष्करी सुधारणा हा पर्याय नाही, तर अनिवार्य धोरणात्मक निर्णय आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.


भारतात सध्या संरक्षण क्षेत्रात मोठे आधुनिकीकरण सुरू आहे. नवी प्लॅटफफॉर्म्स, अत्याधुनिक तंत्रज्ञान, स्थानिक उत्पादनाला प्रोत्साहन आणि खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता याकडे सरकारचा भर असल्याचे सिंह यांनी सांगितले. आत्मनिर्भर भारत मोहिमेमुळे संरक्षण औद्योगिक क्षेत्र मजबूत होत असून, परदेशी साधनसंपत्तीवरील अवलंबित्व कमी होत आहे, असेही त्यांनी निदर्शनास आणले.

सशस्त्र दलांना देशाच्या सुरक्षिततेचे भक्कम आधारस्तंभ म्हणताना, सीमांचे रक्षण, आपत्ती व्यवस्थापन, सागरी सुरक्षेतील सहभाग आणि आंतरराष्ट्रीय शांतता मोहिमांमधील योगदान याबद्दल त्यांनी गौरव व्यक्त केला. भारतीय जवानांची तयारी आणि शौर्यामुळेच भारत आपल्या शेजारील व जागतिक आव्हानांना समर्थपणे सामोरे जाऊ शकतो, यावर त्यांनी भर दिला.

भविष्यातील युद्धांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता व अत्याधुनिक तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याने या क्षेत्रातही मोठी गुंतवणूक केली जात असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमात त्यांनी लष्करासाठी एआय-संबंधित नवे प्रकल्प आणि लष्करी हवामान अंदाज प्रणालीचे लोकार्पणही केले.

भारत कोणाच्याही विरोधात नाही; पण देशाच्या सार्वभौमत्वाचा अपमान किंवा सुरक्षेला धोका निर्माण झाल्यास कठोर भूमिका घेण्याची भारताची तयारी कायम आहे, हे सिंह यांनी स्पष्टपणे सांगितले. शांतता हा भारताचा मार्ग असला तरी राष्ट्रहित सर्वोच्च आहे, हे त्यांचे वक्तव्य पुन्हा अधोरेखित करते.

## शब्दकोडे क्र. 23



आडवे शब्द

१. '.... याचवेळी तू असशील तेथे बाळा पाजविले'-'गदिमां'ची कविता ९. नवऱ्याचा भाऊ १०. धातूवर कोरलेली देवप्रतिमा ११. श्वान १२. उत्तर-पश्चिममधील उपदिशा १४. रवाळ १६. मांडणी करणारा १९. भूपती, राणीचा पती २०. आश्रय २१. खून २२. बाज विणण्याची रुंद पट्टी २४. आणि २५. माकडातील एक प्रकार २७. एकूणएक, सर्व ३०. विश्वासघातकी ३२. समुद्रातील अग्नी ३३. किरकोळ सामान ३६. थोरवी ३८. रेशमी धोतर ४०. उंटाच्या पाठीवरील उंचवटा ४१. पराभव, माळ ४२. अथवा, किंवा ४३. षष्ठीचा देवता ४५. कच्चे लिखाण (इंग्रेजी) ४६. चषक, पेला ४९. आजच्या आधीचा दिवस ५०. मिठाची चव ५२. लोचट वागणेबोलणे ५४. रत्नाने मढविलेला दागिना ५५. विविध ५६. पातळ खांब ५८. अन्न घशाशी येऊन पोटात ढवळणे ५९. वर्ष, साल ६१. विद्येचे माहेरघर ६२. भुतांचा राजा ६४. खोटाच्या विरूद्ध ६५. वेदना ६६. 'आम्ही जातो आमुच्या गावा, आमुचा ---- घ्यावा' ६८. मर्यादा, हद्द ६९. शोध, मार्ग ७१. वारा ७३. जन्म-मृत्यू ७४. पु.ल. देशपांडे यांचे एक विनोदी नाटक

उभे शब्द

१. कैफ, नशा २. दार ३. बारावी रास ४. रम्य, मनोहर ५. नुकसान ६. मगर ७. चैतन्य, जीव ८. मुलेबाळे असलेला १३. दु:ख १५. गूढपणे, गूढरीत्या १७. देशाचे नाणे १८. कर्ण १९. भारताचे दोन महान ग्रंथ २३. उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री २५. उत्तराधिकारी २६. स्थितिस्थापकत्वाचा गुण असलेला पदार्थ २८. पारंब्या असलेला वृक्ष २९. तरतरीत, ताजा --- ३०. नीच, दुष्ट ३१. अनाथ ३४. फळावरील साल ३५. सडेतोड बोलणारा ३७. शंकर ३९. रुग्णालय ४३. मनाला टोचणारे दु:ख ४४. ईर्ष्या, बळ ४७. नावापुरता अननसाचा भाऊबंद ४८. नटविणे ४९. संध्याकाळ ५१. टिंगल करणारा ५३. कमी होणे (भाव, तब्येत वगैरे) ५५. ख्रिसमस (मराठीत) ५७. दंड आणि भेद करण्याआधी करण्याचे दोन उपाय ५८. जखमेवर लावण्याचे स्निग्ध औषध ६०. साहित्यातील नऊ भावना ६१. प्राचीन, जुने ६३. वाट फुटेल तसे वेगाने पळणे ६५. हिंदीत शपथ ६६. रात्रीचा पाऊस ६७. श्रीरामाचे एक नाव ७०. विडा ७१. चाळीस शेर ७२. चुलती (हिंदी)

### शब्दकोडे क्र. 22 चे उत्तर

आडवे उत्तर

१.प्रिया आज माझी नसे साथ द्याया ९.जलसा ११.तव १२.काना १३.दफन १४.अनाकलनीय १६.नीर १८.सगा १९.सरस २१.यथार्थ २२.विठ्ठल रखमाई २४.कलेवर २६.पावा २७.सजा २९.कसा ३०.भयंकर ३१.रत्नाकर ३४.तलाव ३६.बडगा ३७.मलमल ३९.कलाकंद ४१.अंतर ४२.कीटाळ ४३.सराईत ४६.रजतपट ४९.पसा ५१.अंतरिक्ष ५२.पर ५४.लवकर ५७.रेलचेल ५९.सट्टा ६०.मन ६१.यदा ६३.भार ६४.कक्ष ६५.वदन ६९.वारी ७०.वणवा ७१.दानव ७२.शारदा ७४.वंदन ७५.पान ७६.खानदान ७८.कलाकार ७९.वापर ८०.अनाथ ८१.सर्रास

उभे उत्तर

२.यातना ३.आवकजावक ४.माननीय ५.नका ६.सेनानी ७.थट्टा ८.यादगार ९.जनसभा १०.सालस १४.अनेकदा १५.यथासंभव १७.रविवार १८.सलवार १८.सलवार २०.रईस २३.खडक २५.रसातल २६.पाककला २८.जादूगर ३२.रबर ३३.काल ३५.सदरा ३७.महिरप ३८.मदत ३९.कळप ४०.कंस ४१.अंत ४२.कीट ४४.ईश्वर ४५.परिचय ४७.जरतर ४८.पहारेकरी ५०.साल ५१.अंजन ५३.चाचे ५५.वसन ५६.कट्टा ५७अ.लक्ष ५८.लवण ६२.दारोदर ६३.भाग्यवंत ६६.दवाखाना ६७.अननस ६८.कशाला ६९.वानवा ७०.वन ७१.दादा ७३.रकाना ७५.पार ७७.नथ ७८.कस

## वृत्तविशेष...

### राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला उमेदवाराचा अपघाती मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**अकोट/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींसाठी २ डिसेंबर रोजी मतदान आणि ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होईल, असे निवडणूक आयोगाने जाहीर केले आहे. या निवडणुकीसाठी उमेदवारांना सोमवार १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री दहा वाजेपर्यंत प्रचार करता येणार आहे. निवडणूक आयोगाच्या या नव्या निर्देशामुळे राज्यात ठिकठिकाणी प्रचाराचा धुरळा उडाला आहे. या अशा वातावरणात अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला एक धक्कादायक आणि दु:खद बातमी कळली आहे. अकोला जिल्ह्यातील अकोट नगरपरिषदेत निवडणूक लढवत असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला उमेदवाराचा अपघाती मृत्यू झाला आहे. अलमास परवीनशेख सलीम असे या महिला उमेदवाराचे नाव होते.

अकोला जिल्ह्यातील अकोट नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक ४ (ब) मधून राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकिटावर अलमास परवीनशेख सलीम निवडणूक लढवत होत्या. रस्ते अपघातात त्यांचा मृत्यू झाल्यामुळे या मतदारसंघाची निवडणूक पुढे ढकलली जाण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार उमेदवारी अर्ज भरलेल्या पात्र उमेदवाराचा निवडणुकीआधी मृत्यू झाल्यास संबंधित मतदारसंघाची निवडणूक स्थगित केली जाते. यानंतर मृत व्यक्ती ऐवजी इतर कोणी निवडणूक लढवू इच्छीत असल्यास त्यांना एक संधी दिली जाते. एखाद्या पक्षाच्या उमेदवाराचा मृत्यू झाला तर संबंधित पक्षाला नवा उमेदवार देण्याची संधी दिली जाते. यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला नवा उमेदवार देण्याची संधी मिळणार आहे.

निवडणूक आयोगाच्या नव्या निर्देशानुसार उमेदवारांना १ डिसेंबरला रात्री दहा वाजेपर्यंत प्रचार करता येणार आहे. अपक्षांना बुधवारी चिन्हाचे वाटप करण्यात आले. त्यामुळे प्रचारासाठीचा कालावधी वाढवण्यात आला आहे. तर, निवडणूक आयोगाने मतदानाच्या वेळेतही बदल केला असून २ डिसेंबरला सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत मतदानाची वेळ असणार आहे. प्रचार बंद झाल्याच्या वेळेपासून सभा, मोर्चे, ध्वनिक्षेपकाचा वापर करता येणार नाही. तसेच निवडणूक प्रचाराशी संबंधित जाहिरात प्रसिध्दी, प्रसारण देखील बंद करावे, असे आदेश राज्य निवडणूक आयोगाने पक्षांना आणि उमेदवारांना दिले आहेत.

### विवाहादरम्यान सहा लाखांचे दागिने चोरीला

**पुणे/प्रतिनिधी :** बाणेर येथील मंगल कार्यालयात विवाहादरम्यान चोरट्यांनी दागिन्यांची पिशवी चोरून सोन्याचे दागिने आणि रोकड असा सुमारे सहा लाखांचा ऐवज लंपास केला आहे. या प्रकाराने एकच खळबळ उडाली आहे. याबाबत चतु:शृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदाराच्या मुलीचा विवाह समारंभ २५ नोव्हेंबर रोजी बाणेर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यांनी एका टेबलवर गडबडीत दागिन्यांची पिशवी ठेवली. पिशवीत सोन्याचे दागिने, एक लाख ३० हजारांची रोकड, मोबाइल संच असा ऐवज होता. चोरट्यांनी संधी साधून पिशवी चोरली. पिशवी चोरीला गेल्याचे लक्षात येताच पोलिसांकडे तक्रार दिली. घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले. कार्यालयाच्या परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले असून, चोरट्यांचा माग काढण्यात येत आहे. सहायक पोलीस निरीक्षक अनिकेत पोटे तपास करत आहेत. दरम्यान, विवाह समारंभातून दागिने चोरीला जाण्याची ही तिसरी घटना आहे. पंधरा दिवसांपूर्वी लोणी काळभोर परिसरातही अशीच घटना घडली होती.

### अजितदादांनी घेतली संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट

**बीड/प्रतिनिधी :** बीडचे मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे अवघा महाराष्ट्र हादरला. या घटनेला आता वर्षपूर्ण झालं आहे पण अजूनही देशमुख कुटुंब न्यायाच्या प्रतिक्षेत आहेत. आज संतोष देशमुख यांच्या प्रथम पुण्यतिथी निमित्ताने देशमुख कुटुंबीयांच्या भेटीसाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार पोहोचले. यावेळी त्यांनी वैभवीचा शिक्षणासंदर्भात आणि न्यायालयीन लढाईमध्ये सहकार्य करण्यासंदर्भात चर्चा केली.

मसाजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या प्रथम पुण्यतिथी निमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देशमुख कुटुंबाची भेट घेतली. यावेळी त्यांनी धनंजय देशमुख आणि वैभवीशी संवाद साधला. या भेटीनंतर धनंजय देशमुख यांनी माहिती दिली.

''आमच्या भावाचा खून झाला, त्यानंतर त्यांनी जिल्ह्याची परिस्थिती काय आहे त्याबाबत चर्चा केली. पुढे वेळ भेटला आणि वेळ आली तर आम्ही निवेदन देखील देऊ. आम्ही आज काही जास्त बोललो नाही. आज दुखाचा दिवस आहे. त्यामुळे फार काही बोलणे झाले नाही, जेव्हा निरोप येईल तेव्हा भेट घेणार आहोत. आता त्यांना कधी वेळ मिळतो, तसा ते निरोप देतील त्यावेळी जाणार आहे, असे धनंजय देशमुख यांनी सांगितले. तसेच. 'न्यायालयीन प्रकरणामध्ये काही अडचण असेल, काही मदत लागत असेल तर त्याबद्दल विचारणा केली. पण, आम्ही दादांना सांगितले. ज्यांनी खून केला त्यांनी पाप केलेले आहे. त्यांना शिक्षा व्हायला हवी. कारण, त्यांना शिक्षा झाली नाहीतर ते आणखी एक टोळी तयार करतील.

# किशोर गारोळे यांना नगराध्यक्ष बनविण्यासाठीच मेहकरच्या जनतेने हाती घेतली न.प. निवडणूक

## ॲड. जयश्रीताई शेळके यांनी अनुभवले किशोर गारोळेमय वातावरण, गारोळे नगराध्यक्ष होणार असल्याचा व्यक्त केला विश्वास

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार किशोर गारोळे यांना नगराध्यक्षपदी विराजमान करण्यासाठी मेहकरच्या जनतेने नगर परिषदेची निवडणूक हाती घेतली आहे. कोणत्याही परिस्थितीत किशोर गारोळे यांनाच नगराध्यक्ष बनवायचे आहे, असा ठाम निर्धार मेहकर शहरवासियांनी केला आहे. या निर्धारामुळेच हजारोजण किशोर गारोळे यांच्या उपरोक्ष त्यांचा प्रचार करीत आहेत. अशापद्धतीने मेहकरची जनता किशोर गारोळे यांचा परस्पर प्रचार करीत असल्याने मेहकर शहर हे किशोर गारोळे मय झाले आहे.

किशोर गारोळे यांचा हा माहोल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रदेश प्रवक्त्या जयश्रीताई शेळके यांनी आज (ता. २९) अनुभवला. त्या किशोर गारोळे यांच्या प्रचार रॅलीनिमित्ताने मेहकरमध्ये आल्या होत्या. मेहकरमधील प्रभाग एक अन् प्रभाग १२ मधील रॅलीमध्ये त्या सहभागी झाल्या. यावेळी त्यांनी किशोर गारोळे हेच नगराध्यक्ष होणार, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी स्व. दिलिपराव रहाटे यांच्या पत्नी निर्मला रहाटे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मेहकर तालुकाप्रमुख निंबाजी पांडव, आमदार सिद्धार्थ खरात यांचे पुत्र सार्थ खरात यांच्यासह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नगरसेवक-नगरसेविका पदाचे उमेदवारही उपस्थित होते.





### किशोर गारोळे नगराध्यक्ष, म्हणजे आपण सर्व नगराध्यक्ष!

किशोर गारोळे हे नगराध्यक्ष झाले म्हणजे मेहकर शहरातील प्रत्येकजण नगराध्यक्ष झाला, अशी भावना मेहकर शहरवासिय बोलून दाखवत आहेत. किशोर गारोळे यांना आपण कधीही भेटू शकतो. आपुलकी अन् हक्काने त्यांच्या घरीदेखिल जाऊ शकतो. कोणतेही काम हक्काने सांगू शकतो. त्यामुळे माणुसकीशील, नम्रता अन् सज्जन असलेले किशोर गारोळे हे मेहकर शहरवासियांना काळजातून जपणार आहेत. त्यांनाच नगराध्यक्ष बनविणार आहेत, असे संवाद मेहकर शहरात ऐकायला मिळत आहेत.

### किशोर गारोळे हे माणुसकी अन् विकासाचे गाव, त्यांच्यासाठी प्रत्येकाच्या काळजात आशीर्वादाचा भाव!

ज्या युवा व्यक्तिमत्त्वानं व्यवसाय-उद्योगात येऊन स्वमेहनत अन् कल्पकतेवर मेहकरचं नावं सगळीकडे पोहोचवलं. मेहकर शहरातील अनेकांना व्यावसायिक दृष्टी देऊन पोटापाण्याला लावलं. त्या माणसाच्या हाती मेहकर नगरीचा कारभार आला तर अनेक बेरोजगारांना रोजगार देण्याचं कामं ते व्यक्तिमत्त्व करेल, अशाप्रकारे मेहकर शहरवासिय मंडळी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार किशोर गारोळे यांच्याबद्दल व्यक्त होत आहेत.

यामध्ये प्रामुख्याने नगराध्यक्ष पदाचे उमेदवार किशोर गारोळे, प्रभाग एक मधील उमेदवार रुपालीताई गारोळे, प्रा. सतीश ताजने अन् प्रभाग १२ मधील उमेदवार अशोक तुपकर, लता अडेलकर हेदेखिल उपस्थित होते. यासोबतच, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख आरती देशमुख, महिला आघाडी तालुकाप्रमुख स्वाती नवले, महिला आघाडीच्या शहरप्रमुख पौर्णिमा गवई, अमोल बोरे यांच्यासह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते देखिल रॅलीमध्ये सहभागी झाले होते.

यावेळी जनशक्तीची मन:शक्ती किशोर गारोळे यांच्याच बाजूने असल्याचे सर्वांना अनुभवायला मिळाले. जनशक्तीच्या आशीर्वादानेच किशोर गारोळे हे नगराध्यक्ष होणार, अशी चर्चा आता सगळीकडे सुरू झाली आहे.

मेहकर शहराच्या सर्वांगिण विकासासाठी, शहरात सर्वहितेषू नाविण्यपूर्व उपक्रम राबविण्यासाठी, शहरात नवनवीन उद्योग-व्यवसाय उभे राहण्यासाठी, एमआयडीसीचा विकास होण्यासाठी, शहराला नियमित पाणीपुरवठा होण्यासाठी, आपल्याला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार किशोर गारोळे यांनाच नगराध्यक्ष बनवायचे आहे, असा निर्धारच मेहकर शहरवासियांनी केला आहे. किशोर गारोळे हे विकासात्मक दृष्टिकोण असणारं ग्रेट व्यक्तिमत्त्व आहे. त्यामुळे त्यांना अंत:करणपूर्वक अन् भान ठेवून जाणूनबुजून जपायचंच आहे. त्यांना रेकॉर्डब्रेक मतदान करुन नगराध्यक्षपदी विराजमान करायचेच आहे, असेही लोकं उघडपणे बोलत आहेत. किशोर गारोळे हे माणुसकी अन् विकासाचे गाव, त्यांच्यासाठी प्रत्येकाच्या काळजात आशीर्वादाचा भाव!अशापद्धतीने मेहकरवासीय व्यक्त होत आहेत. वाट पाहून आहेत सर्वांचे डोळे, पाहायचे आहेत सर्वांना नगराध्यक्षपदी विराजमान झालेले किशोर गारोळे, अशी आतुरता आता मेहकर शहरवासियांना लागली आहे.

### धनुष आणि क्रिती सेनॉन स्टारर 'तेरे इश्क में'नं केली बॉक्स ऑफिसवर पहिल्या दिवशी धमाकेदार कमाई...

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेता धनुष आणि क्रिती सेनॉन अभिनीत बहुप्रतीक्षित 'तेरे इश्क में' या चित्रपटानं रिलीजपूर्वीच बरीच चर्चा निर्माण केली होती. या चित्रपटाचा ट्रेलर खूप गाजला होता. आता चाहते चित्रपटाच्या रिलीजची आतुरतेनं वाट पाहत आहेत. या चित्रपटाची ॲडव्हान्स बुकिंग देखील चांगलचं झाली होती. हा चित्रपट शुक्रवारी मोठ्या पडद्यावर रिलीज झाल्यानंतर, प्रेक्षकांनी थिएटरमध्ये गर्दी केली होती. 'तेरे इश्क में'नं बॉक्स ऑफिसवर पहिल्या दिवशी चांगली कमाई केली आहे. धनुष आणि क्रिती सेनॉन स्टारर चित्रपटाच्या पहिल्या दिवसाचे कलेक्शन किती झाले आहे. याबद्दल आता आम्ही तुम्हाला सांगणार आहोत. यावर्षी 'सैयारा' आणि 'एक दीवाने की दिवानीयत' सारख्या रोमँटिक चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर चांगलीच कमाई केली आहे. 'तेरे इश्क में' चित्रपटाचं बॉक्स ऑफिस कलेक्शन : सॅकनिल्कच्या सुरुवातीच्या ट्रेंड रिपोर्टनुसार, आनंद एल. राय दिग्दर्शित 'तेरे इश्क में' या चित्रपटानं रिलीजच्या पहिल्या दिवशी १६.५० कोटींची कमाई केली. हे आता या चित्रपटाच्या कमाईचे प्राथमिक आकडे आहेत. अधिकृत डेटा जाहीर झाल्यानंतर यामध्ये काही बदल होऊ शकते. बॉलिवूडचे प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक आनंद एल. रॉयचा 'तनु वेड्स मनु' आणि 'रांझणा'नंतर 'तेरे इश्क में' हा चित्रपटही हा खूप धमाकेदार आहे, असं अनेकांनी सोशल मीडियाद्वारे पोस्ट शेअर करून म्हटलं होतं. धनुषनं बॉलिवूडमध्ये यापूर्वी 'रांझणा' आणि 'अतरंगी रे' या चित्रपटांमध्ये काम केलं आहे. त्याचे हे दोन्ही चित्रपट त्याच्या चाहत्यांना खूप पसंत आले होते. आता त्याला 'तेरे इश्क में' या चित्रपटाकडून देखील खूप अपेक्षा आहेत.

दिग्दर्शक आनंद एल. रॉयनं सांगितली होती माहिती : दिग्दर्शक आनंद एल. रॉय आणि कलर येलो बॅनरनं चित्रपटाचा टीझर शेअर करताना असं लिहिलं आहे की, 'काही कथा जुन्या मित्रांना भेटण्यासारख्या असतात! ते हात हलवत नाहीत, ते थेट तुम्हाला मीठी मारण्यासाठी येतात... १० वर्षांपूर्वी, आम्हाला अशीच एक कथा भेटली... कुंदनची कथा. तो माझा मित्र होता, पण तो जगू शकला नाही... तो जगण्याच्या मूडमध्ये नव्हता! आता, १० वर्षांनंतर, आणखी एक कथा समोर आली आहे, कुंदन आणि हा मुलगा सारखाच आहे, फक्त तो जग उद्धवस्त करण्याच्या मूडमध्ये आहे! फक्त तुमच्यासाठी... 'तेरे इश्क में' आता हा चित्रपट येणाऱ्या दिवसांमध्ये बॉक्स ऑफिसवर धमाकेदार कमाई करेल असं सध्या दिसत आहे.

### 'तिजोरीच्या चाव्या तुमच्याकडे असल्या तरी मालक आमचेच आहेत'

**अंबरनाथ/प्रतिनिधी :** 'तिजोरीच्या चाव्या माझ्याकडे आहेत, निधी मी देतो त्यामुळे घड्याळाला मतदान करा' असे काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका प्रचारसभेत राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार म्हणाले होते. या वक्तव्याचा समाचार भाजपच्या चंद्रकांत पाटील यांनी अलिकडेच घेतला. आता भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनीही अजित पवारांना सुनावले आहे. तिजोरीच्या चाव्या तुमच्याकडे असल्या तरी मालक आमचेच आहेत, असे भाजप आमदार गोपीचंद पडळकर एका प्रचारसभेत म्हणाले. ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ येथे झालेल्या एका प्रचार सभेत भाजप आमदार गोपीचंद पडळकर बोलत होते.याआधी भाजपचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनीही अजित पवारांना कडक शब्दात सुनावले होते. तिजोरीच्या चाव्या जरी तुमच्याकडे असतील तरी तिजोरीचे मालक आमचे आहेत असं चंद्रकांत पाटील म्हणाले. तर तिजोरी जरी तुमच्याकडे असली, त्याच्या चाव्या जरी तुमच्याकडे असल्या तरी , तिजोरी ज्या खोलीत आहे आणि तुम्ही ज्या खोलीत राहता त्या खोलीचे मालक आमचे आहेत; असे भाजप आमदार गोपीचंद पडळकर अंबरनाथ येथे झालेल्या एका प्रचार सभेत म्हणाले.पडळकरांनी खासदार सुप्रिया सुळे यांच्यावरही टीका केली. ज्या डोळ्यांवर दोन लाखाचा चष्मा, ज्यांच्या पायात पन्नास हजाराची सँडल, ज्यांच्या काखेत दीड लाखाची पर्स आणि जे मरिन ड्राईव्हवर हजार रुपयांचा चहा पितात अशा बहिणींसाठी लाडकी बहीण योजना नाही. ज्या बहिणीला पन्नास रुपये देखील खर्च करायला नसतात त्या बहिणी करता लाडकी बहीण योजना आहे, असे भाजप आमदार गोपीचंद पडळकर म्हणाले.

# नगर परिषद निवडणुकीसाठी ईव्हीएम मशीन सिलिंग प्रक्रिया पार, मेहकरमध्ये प्रशासनाची काटेकोर तयारी

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी ईव्हीएम (मतदान मशीन) सिलिंगची प्रक्रिया शनिवारी अत्यंत पारदर्शक व सुरक्षित वातावरणात संपन्न झाली. प्रथम ईव्हीएम सिलिंग आणि मतदान प्रक्रियेबाबत सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले, त्यानंतर सर्व मशीनचे नियमानुसार सीलिंग करण्यात आले. ही प्रक्रिया उपविभागीय अधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी रवींद्र जोगी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.





या कार्यामध्ये मुख्याधिकारी व सहाय्यक निवडणूक अधिकारी रामराजे कापरे, तहसीलदार व अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी निलेश मडके, परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी व अप्पर तहसीलदार प्रशांत सानप, नायब तहसीलदार व नोडल अधिकारी प्रविण देशमुख, मास्टर ट्रेनर तसेच सर्व राजकीय पक्षांचे उमेदवार व अपक्ष उमेदवार उपस्थित होते. ईव्हीएमच्या कार्यपद्धतीविषयी मास्टर ट्रेनरमार्फत अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन मशीनची तांत्रिक तपासणी व प्रभागनिहाय उमेदवारांची माहिती सेट मॉक मतदानाचे प्रदर्शन मतदानादरम्यान उद्भवू शकणाऱ्या तांत्रिक समस्यांवरील उपाययोजना अधिकाऱ्यांकडून सर्व मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन सिलिंग करण्यात आलेल्या सर्व मशीन निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार पूर्ण सुरक्षा व्यवस्थेसह सुरक्षित कक्षात ठेवण्यात आल्या. हे काम ठाणेदार व्यंकटेश्वर आलेवर व त्यांची सुरक्षा चमू यांच्या उपस्थितीत पूर्ण झाले.

उपस्थित मान्यवर व अधिकारी :

किशोर काळे, संदीप मेटानगले, गजानन ढोके, मास्टर ट्रेनर गोपाल उंबरकर, राहुल मोहिते, दीपक सवडतकर, बालाजी तिरके, अनुप नरुटे, तसेच सर्व झोनल अधिकारी, नोडल अधिकारी आणि सहाय्यक कर्मचारी यांची उपस्थिती उल्लेखनीय ठरली. मेहकर नगरपरिषद निवडणूक निर्विघ्न, पारदर्शक आणि शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे या उपक्रमातून स्पष्ट झाले.